नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २०/०५/२०२५ (मंगळवार)**

---

## घरफोडीचा गुन्हा उघड , ५ लाख २० हजार २०० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण जिल्हा यांची कामगिरी

पोलीस स्टेशन काटोल येथे दिनांक १७/०५/२०२५ रोजी फिर्यादी नामे अभय नामदेवराव कोहळे , वय ४७ वर्षे, रा. मेंढेपठार बाजार, ह.मु. आय.यु.डि.पी. काटोल, ता. काटोल, जि. नागपूर, यांनी रिपोर्ट दिली की, फिर्यादी हे घराला लॉक लावुन बाहेर गावी गेले असता दिनांक १३/०५/२०२५ चे रात्री ११:०० ते दिनांक १७/०५/२०२५ रोजी चे ०६:०० वाजेच्या दरम्यान कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादी घराचे दरवाज्याचे कडी कोंडा तोडुन घरातील लोखंडी कपाटातुन सोन्याच चांदीचे दागिने , इतर ऐवज ,रोख रक्कम आणि बाहेर उभी असलेली चार चाकी वाहन टाटा पंच क्र. एम.एच.४०, सि.एक्स. ४४०१ किमती ५,००,०००/— रू. असा एकुण १०,६३,०००/— रूपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. अशा रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन काटोल येथे अपराध क्रमांक ४०६/२०२५ कलम ३३१(३), ३३१(४), ३०५(अ) भा.न्या.स. अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयाचा तपास काटोल पोलीस करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांच्या पथकाने सुध्दा समांतर तपास सुरू केला होता. दिनांक २०/०५/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर गुन्ह्यात तपासादरम्यान गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पध्दतीने तपास करून सदर गुन्हयात दोन विधीसंघर्ष ग्रस्त बालक पत्ता. काटोल यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न केले. पोलीसांनी नमुद विधिसंघर्ष ग्रस्त बालकांडुन **१)** एक ग्रे रंगाची टाटा पंच कंपनीची कार क्र. एम.एच.४०, सि.एक्स. ४४०१ किंमती ५,००,०००/रूपये ,**२) २ अॅड्रॉईड मोबाईल ,३) ४**

**चाब्या आणि ४) २ गॉगल्स् असा एकुण किंमती ५,२०,२००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

सदर गुन्हयाचा जप्त मुद्देमाल काटोल पोलीसांना हस्तांतरीत करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास काटोल पोलीस करीत आहे.

## सराईत गुन्हेगार आनंद देवशंकर वर्मा याला एम.पी.डी.ए कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत राहणारा सराईत आरोपी **नामे आनंद देवशंकर वर्मा , वय ३०वर्षे, रा. वार्ड क्रं १ येरला** हा पोलीस स्टेशन रेकॉर्डवरील गुंड असुन परीसरात गुंडगिरी करतो. त्यांचे विरूध्द अनेक गंभीर गुन्हे नोंद आहेत.तसेच तो गांजा विक्रीचे अवैध व्यवसायात सक्रीय आहे .त्याच्या असमाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करून दहशत पसरवित असतो. नागपुर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरूध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवुन त्याचे विरूध्द गुन्हे नोंद करून त्याला अटक केले आहे. आरोपी **नामे आनंद देवशंकर वर्मा , वय ३० वर्षे, रा. वार्ड क्रं १ येरला** याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी **नामे आनंद देवशंकर वर्मा , वय ३० वर्षे, रा. वार्ड क्रं १ येरला** याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली कळमेश्वर पोलीसांकडुन एम.पी.डी.ए. कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दिनांक १५/०५/२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी सराईत गुन्हेगार **नामे आनंद देवशंकर वर्मा , वय ३० वर्षे, रा. वार्ड क्रं १ येरला याचे विरूध्द स्थानबध्दतेता आदेश काढला असुन तेव्हा पासुन नमुद आरोपी हा मिळुन येत नव्हता. कळमेश्वर पोलीसांनी शिताफिने नमुद आरोपीचा शोध घेवुन त्यास दिनांक १९/०५/२०२५ रोजी आदेश तामील करून त्याला मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे दाखल केले आहे.**



**आरोपी नामे आनंद देवशंकर वर्मा**

## नागपुर जिल्हयातुन सावनेर हद्दीतील गुन्हेगार तडीपार

सावनेर पोलीस स्टेशन हद्दीत राहणारा आरोपी नामे **अक्षय शंकरराव बागडे, वय २८ वर्षे, रा सिल्लोरी, ता. सावनेर जि नागपुर** याचेवर चोरी , दुखापती या सारखे अनेक गुन्हे दाखल असुन सदर आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवईचे असल्याने अशा प्रकारचे गुन्हे करून सामान्य जनतेच्या मनात दहशत परवितो तसेच आरोपीच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रशन निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१)(अ)(ब) अन्वये तडीपार करण्याचा प्रस्ताव सावनेर पोलीसांनी उपविभागिय दंडाधिकारी सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर

करून नमुद **आरोपी अक्षय शंकरराव बागडे, वय २८ वर्षे, रा सिल्लोरी, ता. सावनेर जि नागपुर याला दिनांक २०/०५/२०२५ पासुन २ महीन्याकरीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन तडीपार केले आहे. नमुद इसमास सावनेर पोलसांनी पांढुर्णा, राज्य मध्यप्रदेश येथे नेवुन सोडले असुन नमुद इसम नागपुर जिल्हयाच्या हद्दीत दिसुन आल्यास तात्काळ पोलीस स्टेशन सावनेर किंवा नजिकचे पोलीस स्टेशनला माहीती दयावी.**



**आरोपी नामे अक्षय शंकरराव बागडे**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई
## ५ जनावारांची सुटका, उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :—दिनांक १९/०५/२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी बायपास चौक उमरेड येथे, नाकाबंदी केली असता संशयीत बोलोरो पिकअप एम एच ४८ एके २६५० मिळुन आले वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये ५ गोवंश जनावरे मिळुन आले. नमुद जनावारांना कमी जागेत निर्दयते कोंबुन, चारापाण्याची व्यवस्था न करता वाहतुक करतांना मिळुन आले .तसेच चालक **सुरेश मधुकर भाजीपाले, वय ४५ वर्षे, रा. कोंडा कोसरा, ता. पवनी जि. भंडारा** हा मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन एक बोलोरो पिकअप एम एच ४८ एके २६५० किंमती ४,००,०००/— रूपये. आणि ५ गोवंश जनावरे किंमती १,२०,००० /— रूपयाचा एकुण किंमती ५,२०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

**सुरेश मधुकर भाजीपाले, वय ४५ वर्षे, रा. कोंडा कोसरा, ता. पवनी जि. भंडारा** याच्या विरूध्द महा पशु संरक्षण अधिनियम सह कलम प्राण्याचां छळ अधि.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक १९/०५/२०२५ रोजी केळवद पोलीस हद्दीत पेट्रलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मध्यप्रदेश राज्यातुन विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी सावरगाव ते सावनेर रोडवर तिष्टी बसस्टॉप जवळ नाकाबंदी केली असता टाटा कंपनीचा टिप्पर क्र.एम.एच. ३६ एफ ५८०० हे वाहन मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आणि क्लिनर यांना नाव पत्ते विचारले असता चालक आरोपी क्रं १. नामे **बबलु शंकर कुमरे, वय ३५ वर्षे, पत्ता. मरामाय**

**नगर, काटोल आणि क्लिनर आरोपी क्रं २ नामे हर्षल संजय खंडाते, वय २१ वर्षे, पत्ता. फल्ली मार्केट, काटोल अशी माहीती प्राप्त झाली. चालक आणि क्लिनर यांना** परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **तसेच वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता वाहन मालक आरोपी क्र ३ नामे प्रणय मानकर रा. पंचवटी काटोल याचे सांगणेवरून अवैध रेतीची वाहतुक केली जात असल्याचे समजले.** पोलीसांनी पंचासमक्ष **१)** ६ ब्रास रेती किंमती ३०,००० /— रूपये **२)** टिप्पर क्र.एम.एच. ३६ एफ ५८०० किंमती ३५,००,०००/— रूपये **३) एक अॅड्रॉईड मोबाईल किंमती १०,०००/— रूपये असा एकुण** ३५,४०,०००**/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीतांच्या विरूध्द पोस्टे केळवद येथे **कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम , कलम ०३ सार्व. संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी क्र.१ आणि २ यांना पोलीसांनी अटक केली आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना मुरूमाची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द कारवाई स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीणी आणि खापा पोलीसांची संयुक्त कारवाई

पोलीस स्टेशन खापा :— दिनांक १९/०५/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध मरूम चोरीवर कारवाई कामी पेट्रलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, कोथुळर्णा शिवारातील वैष्णवी ढाब्याचे मागे शासकीय जागेतील पाहडीतुन अवैधरित्या मुरूमाची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नमुद माहीती खापा पोलीसांना देवुन तेथील अंमलदारांची मदत घेवुन कारवाई केली. पोलीस पथक मिळालेल्या माहीतीच्या आधारे कोथुळर्णा गावाकडे जात असतांना वैष्णवी ढाब्याचे आधी ३ लाल रंगाचे ट्रॅक्टर ट्रॉली कोथुळर्णा गावाकडे हायवे रोडने जात असतांना दिसले.पोलीसांना येताना पाहताच तिन्ही ट्रॅक्टर चालक हे आपले ट्रॅक्टर रोड च्या कडेला लावुन जंगलात पळुन गेले. पोलीसांनी पंचासमक्ष तिन्ही ट्रॅक्टर ट्रॉली ची पाहणी केली असता ट्रॉली मध्ये गौणखनिज मुरूम दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष **१) लाल रंगाचा महींद्रा** ट्रॅक्टर ५७५ डि.आय. गाडी क्रमांक एम.एच. ४० सी.क्यु १३८० त्यास जोडुन असलेली विना

क्रमांकाची ट्रॉली किंमती ५,९०,००० /— रूपये आणि ट्रॉली मध्ये ५० स्के.फुट मुरूम किंमती १,०००/— रूपये असा एकुण ५,९१,०००/— रूपयांचा मुद्देमाल **२) लाल रंगाचा महींद्रा** ट्रॅक्टर ५७५ डि.आय. गाडी क्रमांक एम.एच. २७ सी.क्यु ८९३० त्यास जोडुन असलेली ट्रॉली क्रं एम.एच. २७ यु ४३२९ किंमती ५,९०,००० /— रूपये आणि ट्रॉली मध्ये ५० स्के.फुट मुरूम किंमती १,०००/— रूपये असा एकुण ५,९१,०००/— रूपयांचा मुद्देमाल **३) लाल रंगाचा महींद्रा** ट्रॅक्टर ५७५ डि.आय. गाडी क्रमांक एम.एच. ४० सी.एच ७७९५ त्यास जोडुन असलेली ट्रॉली क्रं एम.एच. ४० सी.एच ९१७६ किंमती ५,९०,००० /— रूपये आणि ट्रॉली मध्ये ५० स्के.फुट मुरूम किंमती १,०००/— रूपये असा एकुण ५,९१,०००/— रूपयांचा मुद्देमाल **असा एकुण १७,७३,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद ट्रॅक्टर चालक /मालक आरोपीतांच्या विरूध्द पोस्टे खापा येथे **कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम , कलम ०३ सार्व. संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**